**“नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान” (लेखाशिर्ष २२१७ ०९५१) योजनेअंतर्गत “श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, ता.कामठी, जि. नागपूर” या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास टप्पा १ व २ साठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे आहरीत करून ठेवलेल्या निधीतून रू.५.०० कोटी निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-नासुप्र-२०२६/प्र.क्र.२६/नवि-१६ (ई-१५५९५४८)**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६**

संदर्भ :-

(१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. तीक्षेवी-२०१५/प्र.क्र.१६/१४४४, दि. २६ मे, २०१५.
(२) शासन निर्णय क्र.:-नासुप्र-२०१५/युओआर-५८/प्र.क्र.११४/नवि-२६, दि. २१ डिसेंबर, २०१५.
(३) शासन निर्णय क्र.:-नासुप्र-२०१५/युओआर-५८/प्र.क्र.११४/नवि-२६, दि. ३० ऑक्टोबर, २०१७.
(४) नगर विकास, शासन निर्णय क्र.:-नासुप्र-२०१७/प्र.क्र.९६/नवि-२६, दि. २३ ऑक्टोबर, २०१७.
(५) नगर विकास, शासन निर्णय क्र.:-नासुप्र-२०१७/प्र.क्र.९६/नवि-२६, दि. १० ऑक्टोबर, २०१८.
(६) नगर विकास, शासन निर्णय क्र.:-नासुप्र-१६२२/प्र.क्र.२२७/नवि-२६, दि. २९ मे, २०२५.
(७) नगर विकास, शासन निर्णय क्र.:-नासुप्र-२०२६/प्र.क्र.२३/नवि-१६, दि. ०५ मार्च,२०२६.
(८) नगर विकास, शासन निर्णय क्र:-संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७३/नवि-१६, दि. २७ मार्च, २०२६.

प्रस्तावना :-

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी, ता. कामठी, जि. नागपूर या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडा टप्पा-१ व २ करीता संदर्भाधीन क्र. (२) ते (५) येथील शासन निर्णयान्वये रु. २२०.८१ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच संदर्भाधीन क्र. (६) येथील शासन निर्णयान्वये टप्पा १ व टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यतेमध्ये समाविष्ट नसलेले वस्तु व सेवा कर (GST), किंमतीत बदल (Price Variation) इ. घटकांकरिता रु. ४४.९४ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रु. ३९.९४ कोटी निधी संदर्भाधीन क्र. (७) येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.(८) येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेचा निधी शासन स्तरावर आहरीत करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने रु.५.०० कोटी निधी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, जि.नागपूर या तीर्थस्थळ विकास आराखड्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

**श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, जि.नागपूर** या तीर्थस्थळ विकास आराखड्याच्या टप्पा १ व टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यतेमध्ये समाविष्ट नसलेले वस्तु व सेवा कर (GST), किंमतीत बदल (Price Variation) इ. घटकांकरिता संदर्भाधीन क्र. (६) येथील शासन निर्णयान्वये रु. ४४.९४

कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी उर्वरीत **रु. ५.०० कोटी (अक्षरी रक्कम रु. पाच कोटी मात्र)** इतका निधी शासन स्तरावर आहरीत करण्यात आलेल्या निधीतून वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर विकास आराखड्याअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **"नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण"** राहील.

३. या शासन निर्णयानुसार वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता संदर्भाधीन क्र.(८) येथील शासन निर्णयानुसार तत्कालीन परिस्थितीत निधी शासन स्तरावर आहरीत करण्यात आला असून सह सचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व अवर सचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आले होते. तथापि, प्रशासकीय सोईकरीता या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, नागपूर यांना नियंत्रक अधिकारी तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सह सचिव (नवि-५)/ अवर सचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी या शासन निर्णयामध्ये नमूद केलेला निधी तात्काळ जिल्हाधिकारी, नागपूर / जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांचेकडे सुपूर्द करावा. तसेच जिल्हाधिकारी, नागपूर/ जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांनी सदरचा निधी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

४. दिनांक ३१ मार्च, २०२७ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ करिता वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

५. आहरण व संवितरण अधिकाऱ्याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च, २०२७ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च, २०२७ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

६. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

**७.** राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी इतरत्र थेट वळता करू नये.

**८.** सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**९.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपालिका/ नगर परिषदांना सहाय्य (००) (००) (१४) नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (कार्यक्रम), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ०९५१) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ मधील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

**१०.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५, शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून, २००८ व शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.२१/प्र.क्र.६३/अर्थोपाय दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये कार्यवाही करावी.

**११.** संदर्भाधीन क्रमांक (१) ते (८) येथील नमूद शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

**१२.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०२१२२५२३३३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.02 12:26:06 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई- ४०० ६१४.

६. विभागीय आयुक्त, नागपूर.

७. जिल्हाधिकारी, नागपूर.

८. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

९. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.

१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

११. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१३. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१५. सहसचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. अवर सचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७. जिल्हा सह आयुक्त/ जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

१८. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

१९. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०. निवड नस्ती (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.